पू. बाळाजी आठवले यांचे विचारधन : खंड ३

# सुगम अध्यात्म

## (दैनंदिन जीवनात अध्यात्म कृतीत आणण्यासाठीचे मार्गदर्शन !)

मराठी (Marathi)


संकलक

हिंदु राष्ट्र-स्थापनेचा उद्‌घोष करणारे

**सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत बाळाजी आठवले**

('सच्चिदानंद परब्रह्म' याविषयीचे स्पष्टीकरण 'पृष्ठ ६' वर वाचा.)



**सनातन संस्था**


### पू. बाळाजी (पू. दादा) वासुदेव आठवले यांचे वैशिष्ट्य

पू. दादा यांनी प्रवचनकार आणि कीर्तनकार यांच्याप्रमाणे केवळ इतरांना शिकवले नाही, तर त्यांनी लिहिलेली सर्व शिकवण स्वतःही कृतीत आणली. त्यामुळे ते संतपदाला पोहोचले आणि त्यांनी मुलांनाही शिकवून साधनेत पुढे आणले. त्यामुळेच त्यांचे हे ग्रंथ अनुभवसिद्ध आहेत.

# विषयसूची

卐 सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांचा संक्षिप्त परिचय ५

卐 ग्रंथाचे मनोगत ७

卐 ‘सुगम अध्यात्मशास्त्र’ या ग्रंथमालिकेतील ३ खंडांत पू. बाळाजी (पू. दादा) आठवले यांच्याविषयी दिलेल्या माहितीची अनुक्रमणिका ८

卐 पू. बाळाजी (पू. दादा) आठवले यांचा संक्षिप्त परिचय ९

卐 पू. दादांच्या लिखाणाची सनातनच्या साधकांना जाणवलेली वैशिष्ट्ये ९

卐 पू. दादांच्या छायाचित्राची सनातनच्या साधकांना जाणवलेली वैशिष्ट्ये १२

卐 पू. बाळाजी वासुदेव आठवले यांची सूक्ष्मातील वैशिष्ट्ये १६

卐 पू. दादांच्या हस्तलिखितातील चैतन्य १८

卐 प्रकरण

१. बुद्धीप्रामाण्यवादी २. अहंकार २७

३. अध्यात्म ३०

४. मृत्यू आणि मृत्यूनंतर ३४

५. कर्मयोग ३७

६. ज्ञानयोग ४०

७. निरनिराळ्या योगमार्गांची तुलना ५८

८. साधक ९. शिष्य ७०

१०. संत ११. गुरु ७९

१२. राष्ट्र ८३

卐 संकलकांचा वैज्ञानिक दृष्टीकोन आणि अन्य माहिती ८७


---

**टीप :** ग्रंथात काही सूत्रांच्या शेवटी मराठी किंवा इंग्रजी संकेतांक केवळ कार्यालयीन सोयीसाठी दिले आहेत.

### विषयसूचीतील क्रमांक १

## ग्रंथाच्या संकलकांचा परिचय

# सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांचे अद्वितीय कार्य आणि वैशिष्ट्ये यांचा संक्षिप्त परिचय



१. ‘संमोहन उपचारतज्ञ’ म्हणून मुंबईत व्यवसाय (वर्ष १९७८ ते १९९४)

२. अध्यात्मप्रसारार्थ ‘सनातन संस्थे’ची स्थापना

३. हिंदु राष्ट्राच्या (ईश्वरी राज्याच्या) (टीप) स्थापनेचा उद्घोष आणि कार्यारंभ (वर्ष १९९८)

(टीप : हिंदु राष्ट्र [ईश्वरी राज्य] - ‘हीनान् गुणान् दूषयति इति हिंदुः ।’ म्हणजे ‘कनिष्ठ, हीन, अशा रज आणि तम गुणांचा नाश करणारे ते हिंदू.’ अशा सात्त्विक लोकांचे राष्ट्र म्हणजे ‘हिंदु राष्ट्र’ होय.)

४. गुरुकुलासम सनातन आश्रमांची निर्मिती !

५. शीघ्र ईश्वरप्राप्तीसाठी ‘गुरुकृपायोग’ या साधनामार्गाची निर्मिती : गुरुकृपायोगानुसार साधना करून १०.९.२०२२ पर्यंत १२२ साधक संत झाले, तर १,०८३ साधकांची संतत्वाच्या दिशेने वाटचाल चालू.

६. देवता, साधना, आचारधर्मपालन, आदर्श राष्ट्ररचना, धर्मरक्षण आदी विविध विषयांवर विपुल ग्रंथ-निर्मिती आणि ग्रंथ-प्रकाशन

७. ‘ईश्वरप्राप्तीसाठी कला’ व कलेचे सात्त्विक सादरीकरण यांविषयी संशोधन

८. वाईट शक्तींच्या संदर्भातील संशोधन आणि शारीरिक, मानसिक, तसेच वाईट शक्तींच्या त्रासांवरील उपायपद्धतींविषयी संशोधन

९. स्वतःचा देह, तसेच वापरातील वस्तू यांच्यातील दैवी पालटांविषयी संशोधनकार्य अन् स्वतःच्या महामृत्यूयोगाचा संशोधनात्मक अभ्यास

१०. आचारपालनातील कृती, धार्मिक कृती आणि बुद्धीअगम्य घटना यांचे वैज्ञानिक उपकरणांद्वारे संशोधन

११. १०.९.२०२२ पर्यंत २ बालक-संतांची, तसेच ६० टक्क्यांहून अधिक आध्यात्मिक पातळी असलेल्या २३४ अन् अन्य ९०२ दैवी बालकांची ओळख समाजाला करून दिली आहे. दैवी बालकांविषयी संशोधनही चालू आहे.

१२. प्रखर हिंदुत्ववादी नियतकालिक 'सनातन प्रभात'चे संस्थापक-संपादक

१३. धर्माधिष्ठित हिंदु राष्ट्राच्या (ईश्वरी राज्याच्या) स्थापनेसाठी संत, संप्रदाय, हिंदुत्ववादी, देशभक्त आणि सामाजिक कार्यकर्ते यांचे संघटन

१४. भीषण आपत्काळाचा विचार द्रष्टेपणाने अनेक वर्षे आधीच करून आपत्काळात जीवितरक्षणासाठी आवश्यक असणाऱ्या विविध उपाययोजनांविषयी ग्रंथ, नियतकालिके, संकेतस्थळे आदींद्वारे मार्गदर्शन

**(संपूर्ण परिचयासाठी वाचा – संकेतस्थळ 'www.Sanatan.org')**

## डॉ. जयंत आठवले यांच्या 'सच्चिदानंद परब्रह्म' या उपाधीविषयी विवेचन !

'१३.७.२०२२ पासून 'सप्तर्षी जीवनाडीपट्टी'च्या वाचनाच्या माध्यमातून सप्तर्षींनी आज्ञा केल्याप्रमाणे परात्पर गुरु डॉ. आठवले यांना 'सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत बाळाजी आठवले', असे संबोधण्यात येत आहे. 'सच्चिदानंद परब्रह्म' या उपाधीच्या संबोधनाद्वारे 'परात्पर गुरु डॉ. आठवले यांच्यातील ईश्वरी तत्त्वाचा सर्वांना लाभ व्हावा', हा सप्तर्षींचा या आज्ञेमागील उद्देश आहे. (१३.७.२०२२ पूर्वी सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांना सनातनच्या ग्रंथांमध्ये 'प.पू. [परम पूज्य]' आणि 'परात्पर गुरु' या उपाधींनी संबोधित केले आहे.) या उपाधींनुसार प्रस्तुत ग्रंथाच्या मुखपृष्ठावर आणि ग्रंथात आवश्यक तेथे तसा उल्लेख केला आहे.' – **(पू.) श्री. संदीप आळशी, सनातनच्या ग्रंथांचे संकलक (२४.७.२०२२)**

## ग्रंथाचे मनोगत

‘तरी विद्यांमाजीं प्रस्तुतीं । अध्यात्मविद्या ते मी ।’, म्हणजे ‘सर्व विद्यांमध्ये (श्रेष्ठ) मी अध्यात्मविद्या आहे’, असे ज्ञानेश्वरांनी ‘ज्ञानेश्वरी’त भगवंताचे वर्णन करतांना सांगितले आहे. अध्यात्मविद्या जाणून घेणे म्हणजेच भगवंताला जाणून घेणे. प्रत्येकजण आपली प्रकृती आणि योगमार्ग यांनुसार भगवंताला जाणून घेण्याचा प्रयत्न करतो. सर्व शास्त्रांमध्ये अध्यात्म हे एकमेव शास्त्रच आपल्याला आत्म्याच्या खऱ्या स्वरूपाची, म्हणजे भगवंताची ओळख करून देते अन् सत्-चित्-आनंदमय बनवते.

ईश्वरप्राप्ती हे ध्येय साध्य करण्यासाठी मनुष्याने सातत्याने साधना करणे आवश्यक आहे. ज्ञानयोग, कर्मयोग इत्यादी योगमार्गांने साधना करतांनाही संत किंवा गुरु यांचे मार्गदर्शन आवश्यकच असते; अन्यथा अहंकाराचे वादळ त्याची साधनारूपी नौका परमार्थाच्या पैलतीरी पोहोचण्याआधीच नष्ट करते. संत किंवा गुरु प्रथम अहंकार नष्ट करतात; मगच आत्मज्ञान देतात. ते जीवनात येण्यासाठी स्वतःत साधकत्व निर्माण होणे महत्त्वाचे आहे. चांगले साधकत्व आणि शिष्यत्व निर्माण होण्यासाठी काय करायला हवे, याविषयीचे बहुमोल मार्गदर्शन अत्यंत सोप्या पद्धतीने या ग्रंथात केले आहे.

ज्ञानयोग, कर्मयोग इत्यादी साधनेचे विविध योगमार्ग, साधनेसंदर्भात मार्गदर्शक तत्त्वे, अहंकारामुळे साधनेत होणारी हानी अन् त्यांवरील उपाय यांची माहिती या ग्रंथात असून शिष्य कसा असावा ? संत कसे असतात ? संतांची खडतर साधना आणि गुरूंचे महत्त्व यांविषयीची माहिती यात दिली आहे. बुद्धीप्रामाण्यवाद्यांचा नास्तिकवाद, मनुष्याचा मृत्यूकडे योग्य पहाण्याचा दृष्टीकोन, तसेच राष्ट्रप्रेम अशा विविध विषयांवरील उपयुक्त आणि अनमोल माहितीही अत्यंत सोप्या भाषेत अन् उदाहरणांद्वारे या ग्रंथात दिली आहे.

ही अध्यात्मविद्या आत्मसात होऊन सर्वांची पारमार्थिक उन्नती होवो अन् अध्यात्माचे अधिष्ठान असलेल्या आदर्श राष्ट्ररचनेच्या, हिंदु राष्ट्राच्या निर्मिती-कार्यात सहभागी होण्याची बुद्धी सर्वांना होवो, अशी ईश्वरचरणी प्रार्थना ! – **संकलक**